


# संज्ञापक

कोल्हापूर, दि. २० जून २०२१ खासगी वितरणासाठी



## कोरोना विरोधातील जंग






# लढू आणि जिंकू!



कोल्हापूर : प्रतिनिधी

कारोनाच्या विरोधात भारताने युद्ध पुकारले आहे. विषाणूच्या विरोधातील ही जंग आम्ही लढूही आणि जिंकूही असा निर्धार तरुणांनी केला आहे. समाजातील विविध घटकांची त्यांना साथ आहे. अनेक स्वयंसेवी संस्था, प्रशासकीय अधिकारी, तरुण मंडळे, तालिम मंडळे यांच्यासह अबालवृद्धांनी कोरानाला हरविण्याचा पण केला आहे. आरोग्य कर्मचारी, डॉक्टर, परिचारिका यांच्यासह सर्वच समाजघटक केंद्र आणि राज्य सरकारच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. हा लढा आता अंतिम टप्प्यात असून, लसीकरण पूर्णत्त्वास येताच या लढाही भारतीयांनी जिंकेलेला असेल, असे दिलासादायक चित्र आहे.

# सेविकांमुळे 'आशा' कायम!

शिरोळ : कुणाल कांबळे

देशात कोरोनाचा विळखा पडल्यानंतर या कोरोना काळात आशा सेविकांनी महत्वाची भूमिका पार पाडली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात ३ हजार १३५ आशा सेविका व १४० गटप्रवर्तक आहेत. कोरोनाशी दोन हात करण्यासाठी डगमगल्या नाहीत तर अगदी धाडसाने प्रत्येक घराची नोंदणी व तपासणी करण्याचे काम अगदी अविरतपणे करण्याची मोहीम फत्ते करणाऱ्या आशा सेविकांनी कोरोनाकाळात मोलाची कामगिरी बजावली आहे.

उद्या तुमच्या बाळाची लस आहे, प्रसूतीची तारीख जवळ आली आहे असे वारंवार सांगून प्रत्येक घराला जागृत करणारी आशा सेविका आपण नेहमीच पहिली आहे. मातामृत्यू व बालमृत्यू कमी करणे, संस्थात्मक प्रसूती वाढवणे, होम प्रसूती होऊ न देणे, लसीकरण तारीख सांगून मदत करणे, विविध राष्ट्रीय मोहिमांमध्ये सहभाग घेणे यासह विविध कामे आशा सेविका अगदी अविरतपणे पार पाडत असतात. कोरोनाच्या काळात नेहमीच्या कामाशिवाय घराघरात भेटी देणे, बाहेरून आलेल्या नागरिकांची नोंद घेणे, होम क्वारंटाईन करणे, कोरोना संशयित असल्यास तपासणीस पाठवणे, अत्यवस्थ व्यक्तींची यादी तयार करणे ही जोखमीची कामे आशा सेविका यशस्वीरीत्या पूर्ण करत आहेत.

१ ते १० वयोगटातील बालके, गरोदर माता, प्रसूती माता, ५० वर्षावरील व्यक्तींची यादी, महाआयुष ॲपमध्ये सर्व्हे करणे, रेड झोन, कंटेन्मेंट झोनमध्ये रुग्ण सापडलेल्या ठिकाणी १४ दिवस सर्व्हे करण्याची जबाबदारी आशा सेविकांवर दिली होती. थर्मल तपासणी, ऑक्सिजन तपासणी यासारखी कामे आशा सेविकांनी पूर्ण केली. शासनाच्या माझे कुटुंब, माझी जबाबदारी यामध्ये सर्वाधिक कामे आशा सेविकांना दिली होती. याचा सर्वेही चांगल्या प्रकारे करण्यात आला. मात्र या कोरोनाच्या काळात जिल्यातील ६० च्या वर आशा कोरोनाबाधित झाल्या असून काही सेविकांच्या कुटुंबातील व्यक्तींचा जीव गमावला आहे. अनेकांची कुटुंबे उध्वस्त झाली आहेत.

आरोग्यसेवेशी संबधित अनेक महत्त्वपूर्ण कामांचा भार आशा सेविकांवर आहे. मात्र अत्यंत अल्प म्हणजे प्रतिदिवस ३३ रुपये व गटप्रवर्तक यांना १५ रुपये मानधनावर काम करावे लागत आहे. त्यामुळे अशा सेवकांच्या पदरी निराशाच असून शासनाने आशांचा योग्य सन्मान करणे गरजेचे आहे.



कोल्हापूर : राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आशा सेविका कार्यरत असून कोरोनाच्या कठीण काळात फ्रंटलाईन वर्कर म्हणून त्यांनी अत्यंत निष्ठेने काम केले. कोविड प्रतिबंधित क्षेत्रात सर्व्हेसाठी जात असताना अशा सेविका.

२००९ पासून राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आशा सेविका कार्यरत असून कोरोनाच्या कठीण काळात फ्रंटलाईन वर्कर म्हणून काम केले आहे. सेविकांनी अत्यंत अवघड काळात स्वतःचा जीव धोक्यात घेऊन केलेल्या कामाची सरकार निश्चितपणे दखल घेईल. शासनाने आशा सेविकांना शासकीय कर्मचाऱ्याचा दर्जा देऊन त्यांचा सन्मान करावा.

**–नेत्रदीपा पाटील**
जिल्हाध्यक्षा, आशा व गट प्रवर्तक युनियन, कोल्हापूर

## मागण्यांवर सकारात्मक विचार

आरोग्य, पोषण व शिक्षण यासारख्या मूलभूत सेवांच्या खाजगीकरणाचा प्रस्ताव मागे घ्या, आयसीडीएस, एनएचएम, (राष्ट्रीय आरोग्य अभियान) माध्यान्ह भोजन आदी केंद्रीय योजनांवरील केंद्राच्या आर्थिक तरतुदीत भरीव वाढ करून त्या कायम करा, भारतीय श्रम परिषदेच्या शिफारशीनुसार आशा–गटप्रवर्तकसहित सर्व योजना कर्मचाऱ्यांना कामगार म्हणून मान्यता देऊन त्यांना २१ हजार रुपये किमान वेतन, १० हजार रुपये मासिक पेन्शन व इएसआय, पीएफ लागू करा आदी मागण्या अशा व गटप्रवर्तक युनियनने केल्या आहेत. या मागण्यांचा सकारात्मक विचार करू, असे आश्वासन सरकारच्यावतीने देण्यात आले आहे.



शिरोळ : घरोघरी जाऊन सर्व्हे करताना आशा सेविका.

### राज्यात ६७ हजार आशा, साडेतीन हजार गटप्रवर्तक महिला

राज्यात ६७ हजार आशा व साडेतीन हजार गटप्रवर्तक महिला आहेत. एक हजार लोकसंख्येमागे एक आशा, अशाप्रकारे काम सुरू आहे. विशेष म्हणजे कोविडच्या रुग्णांबाबतची संपूर्ण माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्याची जबाबदारी आशांवर सोपविण्यात आली आहे. हे एक राष्ट्रीय कर्तव्य समजून आशासेविका या गावोगावी, घरोघरी फिरून, कोविडच्या या धोकादायक काळातसुद्धा आपले काम इमानेइतबारे करीत आहेत. घराघरात जाऊन सर्दी, ताप, खोकला, वास न येणे, चव न येणे, ऑक्सिजनची मात्रा तपासणे, नागरिकांची नावे, पत्ता यासर्व बाबींची माहिती गोळा करून ती वैद्यकीय अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य मागील दीड वर्षापासून करीत आहेत. विशेष म्हणजे ६० वर्षांवरील व अतिगंभीर रुग्णांची यादी तपशिलासह तयार करण्याची जबाबदारीसुद्धा आशांवर टाकण्यात आली आहे.